# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

### दि. ०१.०४.२०१३ ते ३१.०३.२०१४

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वय समितीची बैठक दि. २२.०७.२०१३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत खालील ठराव चर्चा करुन मंजूर करण्यात आले.

१) या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस मंजूरी देण्यात आली.

२) मागील वर्षाच्या कार्यक्रमाबद्दल आढावा घेण्यात आला.

३) गरीब विद्यार्थी निधी संकलन करण्याचे ठरले.

४) या वर्षाच्या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

**उपक्रम :-**

**१) सर्प विज्ञान प्रबोधन पंधरवाडा :-**

दि. ०१/०८/२०१३ रोजी रा.से.यो. व अंधश्रद्धा निर्मुलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सर्प विज्ञान प्रबोधन पंधरवाडा निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सहसचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव होते. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एस.बी.जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच श्री साबळे साहेब, वनविभाग, सर्पमित्र श्री कांबळे, अंनिसचे माधव बावगे व कार्यक्रमाधिकारी प्रा. व्ही.जे.दळवी, डॉ. पी.डी.पोहेकर, डॉ. एम.एच.गव्हाणे व स्वयंसेवक उपस्थित होते.

**२) जात पंचायत परिषदेत सहभाग :-**

दि. १५/०८/२०१३ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये राज्यव्यापी जात पंचायतीच्या मनमाणीला मूठमाती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. नरेंद्र दाभोलकर होते. तर प्रमुख उपस्थितांमध्ये प्राचार्य अनिरुद्ध जाधव, विनायक पाटील, श्री. बाळकृष्ण रेणके, श्री. उत्तमराव कांबळे, संपादक दैनिक सकाळ तसेच कार्यक्रमाधिकारी प्रा. के.डी.मिरजे, डॉ. एम.एच.गव्हाणे, प्रा.तलवारे व ४५ स्वयंसेवक उपस्थित होते.

**३) डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या निशेधार्थ :-**

दि. २२/०८/२०१३ रोजी रा.से.यो.च्या वतीने रॅलीमध्ये १५० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

**४) रक्षा बंधन कार्यक्रम :-**

रा.से.यो.च्या वतीने महाविद्यालयामध्ये रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बहुसंख्य स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

**५) प्लॅस्टिक निर्मूलन रॅली :-**

दि. ०७/०९/२०१३ रोजी लातूर महानगर पालिकेच्या वतीने प्लॅस्टिक निर्मूलन अभियाना अंतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये महाविद्यालयातील २०० स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी सहभागी झाले होते.

**६) मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रम :-**

दि. १७/०९/२०१३ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मौजे कवठा येथे सेवाग्राम संस्थेमध्ये आयोजीत कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ९५ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**७) शिक्षक दिन :-**

दि. ०५ सप्टेंबर २०१३ रोजी शिक्षक दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. पी.एन.सगर होते तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. ओ.व्ही.शहापूरकर, डॉ. बी.बी.देशमुख, प्रा. एस.डी.भंडारे, कार्यक्रमाधिकारी डॉ. एम.एच.गव्हाणे, प्रा. व्ही.जे.दळवी, डॉ. पी.डी.पोहेकर व स्वयंसेवक उपस्थित होते.

**८) गणपती विसर्जन मिरवणूक सहभाग :-**

गणपती विसर्जन मिरवणूक यशस्वीरित्या पार पडण्यासाठी पोलीस प्रशासनाला मदत करण्यासाठी महाविद्यालयातील रा.से.यो. चे ६० स्वयंसेवक उदगीर व लातूर येथे पोलीस प्रशासनास मदत करत होते.

**९) राष्ट्रीय सेवा योजना दिन :-**

दि. २४ सप्टेंबर २०१३ रोजी रा.से.यो. दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. एम.आर.पाटील होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शकांनी रा.से.यो. व स्वयंसेवकांची भूमिका या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही.जे.दळवी यांनी केले. आभार डॉ. एम.एच.गव्हाणे यांनी केले. कार्यक्रमास डॉ. पी.डी.पोहेकर रा.से.यो.प्रतिनिधी गोविंद बोंबिलवाड व गोदावरी डोणगावे यांच्यासह बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते.

**१०) वाहतूक सुरक्षा अभियान :-**

लातूर पोलीस प्रशासन व राजर्षी शाहू महाविद्यालयातील, रो.से.यो. विभागाच्या वतीने वाहतूक सुरक्षा अभियानाची सुरुवात करण्यात आलेली आहे. या अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. या अंतर्गत लातूर शहरातील वाहतुकीला शिस्त लावणे व वाहनांची पार्कींग योग्य पद्धतीने करणे हे अपेक्षीत आहे. या उपक्रमात उप-विभागीय पोलीस अधिकारी श्री. तिरुपती काकडे, पोलीस निरीक्षक श्री. कुबडे साहेब, कार्यक्रमाधिकारी डॉ.एम.एच.गव्हाणे, प्रा. के.डी.मिरजे, प्रा. तलवारे व १२५ स्वयंसेवक सहभागी आहेत.

**११) प्रजासत्ताक दिन :-**

दि. २६/०१/२०१४ रोजी राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी महाविद्यालयात संपन्न झालेल्या ध्वजरोहन कार्यक्रमास उपस्थित होते.

**१२) समारोप :-**

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ०१/०४/२०१३ पासून ३०/०९/२०१३ पर्यंत वरील उल्लेख केल्याप्रमाणे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. कार्य्रकमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.जाधव, उपप्राचार्य डॉ. पी.एन.सगर, डॉ. एस.डी.साळूंके, प्रा. सौ. एम.एम.दुरुगकर, पर्यवेक्षक प्रा. कल्याण कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. के.डी.मिरजे, प्रा. तलवारे, डॉ. महादेव गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी कृष्णा गायकवाड, गोदावरी डोणगावे, राजकुमार कांबळे, शेख फय्याज, चौधरी श्वेता, लांडगे स्नेहल, राजश्री बारगजे, महेश जाधव, बायस सुरजसिंग, रोहन जैस्वाल, सलेक सुवर्णा, कोटे दिपाली आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

**कार्यक्रमाधिकारी**

**प्राचार्य**

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष युवक शिबीर

## मौजे. धानोरी, ता. जि. लातूर

## 2013-14

**4. जगजागृती फेरी :**

शिबीरकाळात 31/12/2014 या दिवशी जनजागृती फेरी काढण्यात आली. पारंपारिक वेषभुषेमध्ये स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी विविध घोषणांद्वारे ग्राम जागृती केली. विशेषत: शौचालयाचा वापर, ग्राम स्वच्छता, आरोग्य, अंध:श्रद्धा निर्मूलन, एड्स निर्मूलन इत्यादी विषयीच्या घोषणांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. दिंडीमध्ये ग्रामस्थदेखील सहभागी झाले होते.

**5. बौद्धिक कार्यक्रम :**

शिबीर काळात दररोज दुपारी 1.00 ते 4.00, 3.30 ते 5.00 या वेळात बौद्धिक कार्यक्रम घेण्यात आले. वाचन संस्कृती व युवक, स्पर्धा परिक्षा, व्यक्तिमत्व विकास, साप: समज-गैरसमज, पर्यावरण संवर्धन : काळाजी गरज या विषयावर अनुक्रमे डॉ.बी.बी.देशमुख, श्री. गिरी, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, श्री. मिलींद सोनकांबळे, प्रा.डॉ.ओ.व्ही.शहापूरकर यांनी मार्गदर्शन केले.

**6. महिला मेळावा :**

शिबीराच्या तिसऱ्या दिवशी महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास गावातील 90-100 महिला उपस्थित होत्या. महापौर प्रा.सौ.स्मिता खानापूरे, सौ. बबिता वाकडकर, पोलीस उप-निरिक्षक, सौ. विद्या टेकाळे, डॉ. प्रीती पोहेकर, डॉ. अनुजा जाधव यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. शौचालयाचा वापर महिला सुरक्षा याबाबत त्यांना उदबोधित करण्यात आले.

**7. युवक मेळावा :**

युवकांपुढील आव्हाने या विषयाच्या अनुषंगाने युवक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यात मा.आ.वैजनाथदादा शिंदे, आमदार, लातूर ग्रामीण मतदार संघ, श्री. धर्मराज हल्लाळे, श्री. संतोष देशमुख, श्री. राजेसाहेब सवई, श्री. विजय देशमुख, प्रा.सचिन सुर्यवंशी यांनी विद्यार्थी व गावकरी युवकांना मार्गदर्शन केले. यावेळी गावातील विशेष उल्लेखनीय कार्य केलेल्या युवकांचा सत्कार करण्यात आला.

**8. समाज प्रबोधनपर कार्यक्रम :**

समाज प्रबोधनपर कार्यक्रम हा श्री. सतीष रावजादे व सहकारी, जनजागृती कलापथकाचा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम गावकऱ्यांमध्ये विशेष जागृती निर्माण करणारा ठरला.

**9. सांस्कृतिक कार्यक्रम :**

गावकरी व शिबीरार्थी यांच्या मनोरंजनासाठी संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. गायन, नृत्य, मूक अभिनय, काव्य, भारूड, पोवाडा इत्यादी कला प्रकारांच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता इत्यादी विषयांवर सामाजिक जागृती घडविणारे संदेश देण्यात आले. त्याबरोबरच श्री. योगीराज माने, श्री. किसन घारुळे, श्री. नरसिंग इंगळे, श्री. रामदास कांबळे यांचे कवी संमेलन संपन्न झाले.

**10. समारोप :**

31 डिसेंबर, 2013 रोजी शिबीराचा समारोप करण्यात आला. मा.श्री.नामदेव नन्नावरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ.पी.आर.देशमुख, उपाध्यक्ष, शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर हे अध्यक्षस्थानी होते. मा. श्री. नाथसिंह देशमुख, प्रा.नागेश कांबळे, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, प्राचार्य डॉ. एस.बी.जाधव हे कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महादेव गव्हाणे यांनी केले. डॉ. प्रीती पोहेकर यांनी सूत्रसंचलन केले. प्रा.विजय दळवी यांनी आभार मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ व शिबीरार्थी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष 2013-14 मध्ये वरीलप्रमाणे विविध कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस.बी.जाधव, उपप्राचार्य डॉ. पी.एन.सगर व डॉ. एस.डी.साळुंके, उपप्राचार्य प्रा. एम.एम.दुरुगकर, समन्वयक प्रा. के.ए.कांबळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. विजय दळवी, प्रा. डॉ. प्रीती पोहेकर, प्रा. डॉ. महादेव गव्हाणे, प्रा. के.डी.मिरजे, प्रा. श्रीहरी तलवारे, विद्यार्थी प्रतिनिधी गोविंद बोंबीलवाड, डोणगावे गोदावरी, स्नेहल लांडगे, कोटे दिपाली, बायस सुरज इत्यादींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**







राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर समारोप प्रसंगी बोलताना रा.से.यो. विद्यापीठ समन्वयक प्रा.नागेश कांबळे, उपस्थित डॉ. पी.आर.देशमुख बाजूस कार्यक्रम अधिकारी प्रा.विजय दळवी, प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, सरपंच श्री.गोविंद कदम इत्यादी




राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ.गोपाळरावजी पाटील बाजूस कार्यक्रम अधिकारी प्रा.विजय दळवी, प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, सरपंच श्री.गोविंद कदम व श्री.पाटील इत्यादी



राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीरात मौजे धानोरी या ठिकाणी घेण्यात आलेल्या शोषखड्याची पाहणी करताना शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.पी.आर.देशमुख, एन.एस.एस.विद्यापीठ समन्वयक डॉ. नागेश कांबळे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी




राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीरात मौजे धानोरी या ठिकाणी घेण्यात आलेल्या शोषखड्याची पाहणी करताना कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी




राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीरात मौजे धानोरी या ठिकाणी घेण्यात आलेल्या शोषखड्याची पाहणी करताना कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी



संपत्तीच्या संवर्धनासाठी
शिबीर
युवक शिबीर







राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
राष्ट्रीय सेवा योजना
राजकुमार फोटो स्टुडिओ , लातूर


"NOT ME BUT YOU"
राजर्षी शाहू महाविद्यालय
राष्ट्रीय
योजना


राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
राष्ट्रीय सेवा योजना


"NOT ME BUT YOU"
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर
राष्ट्रीय सेवा योजना


राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
राष्ट्रीय सेवा योजना
मतदान जनजागृती अभियान
मतदान जनजागृती दिवस दि-28/03/2014


"NOT ME BUT YOU"
राजर्षी शाहू महाविद्यालय






राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर
"NOT ME BUT YOU"
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर



राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक श्री. गोविंद बोंबिलवाड याने प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबई येथे
संचलन (RD Camp) केल्याबद्दल प्रमुख पाहूणे प्रा. गणेश शिंदे यांनी स्नेहसंमेलनाप्रसंगी अभिनंदन केले.


राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.
राष्ट्रीय सेवा योजना
नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी
युवक शिबीर
विशेष युवक शिबीर


शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.
(स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना
पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी
विशेष युवक शिबीर


Department of
Computer Science and
Technology

